# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**प्रेस नोट**

दिनांक 21/04/2021 (बुधवार)

(सायंकाळ)

---

**अवैध गावठी मोहाफुल दारू अड्‌ड्यात धाड**

**पोलिस स्टेशन केळवदची कार्यवाही**

दिनांक 20/04/2021 रोजी ठाणेदार दिलीप ठाकुर यांना मुखबिर कडुन विश्वसनिय खबर मिळाली की, अमित राजपुत यांचे शेतात 1 इसम व 1 महिला मोहाफुल हातभट्टी ची दारु गाळत आहे. या खबरे वरुन ठाणेदार पोनि दिलीप ठाकुर हे दिनांक 20/04/2021 चे 07.36 वा. सरकारी वाहनाने मौजा दाढेरा शिवार येथे 08.00 वा. पोहचुन मौजा दाढेरा शिवारातील अमित चंद्रपाल राजपुत यांचे शेताजवळ पोहचले असता तिथे त्यांचे शेता लागुन असलेल्या विहीरीजवळ 1 इसम व 1 महिला मोहाफुल हातभट्टी लावुन दारु गाळतांना दिसले. त्यादरम्यान आरोपीतांनी पोलीसांना वर्दीमध्ये पाहुन जंगलाच्या दिशेने पळुन गेले. त्यांचा पाठलाग केला असता ते मिळुन आले नाही. पळुन जाणा–या आरोपीतांचे नाव 1) अमित चंद्रपाल राजपुत 2) कामीनी अमित राजपुत दोन्ही रा. तिडंगी तह. कळमेश्वर हे होते. घटनास्थळावरून 200 लीटरच्या मोहाफुल दारू, 50 किलो मोहाफुल व 2600 लीटर रसायन सडवा व इतर साहित्य असा एकुण 2,27,400/– रुपयाचा मुद्देमाल मिळुन जप्त करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील फरार आरोपी नामे 1) अमित चंद्रपाल राजपुत 2) कामीनी अमित राजपुत दोन्ही रा. तिडंगी तह. कळमेश्वर यांनी संगणमत करुन अवैध्यरित्या विना परवाना मोहाफुल दारु गाळण्याचे साहीत्य बाळगुन हातभट्टी लावुन मोहाफुल दारु तयार करतांना मिळुन आले. पोलीस स्टेशन केळवद अप क्र.67/2021कलम 65 (बी)(सी)(ई)(एफ), 83 म दा का अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास सफौ अमरदिप कामठे पो. स्टे केळवद हे करीत आहेत.

सदरची कार्यवाही ही मा. श्री राकेश ओला, पोलीस अधिक्षक नागपूर ग्रा., मा.श्री राहुल माकणीकर, अपर पोलीस अधिक्षक नागपूर ग्रा., मा. श्री अशोक सरबंळकर, उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर यांचे मार्गदर्शनाखाली ठाणेदार पोनि दिलीप ठाकुर, पोउपनि अर्जुन राठोड, सफौ अरुण गुंठे, पोहवा रविन्द्र डोरले, पोशि धोंडुतात्या देवकत्ते, पोशि सचिन येळकर मनापोशि अश्विनी निकोसे चापोहवा गुणेश्वर डाखोळे यांनी केली आहे.



पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर